रयत शिक्षण संस्थेचे,

## सी.डी.जैन कॉलेज ऑफ कॉमर्स, श्रीरामपूर

### शिष्यवृत्ती नोटीस - २०२६-२०२७

# स्वाधार योजना अर्ज नूतनीकरणाबाबत सूचना

१३.०८.२०२६

सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षामध्ये महाविद्यालयात प्रवेश घेतलेल्या सर्व विद्यार्थ्यांना सूचित करण्यात येते की, सन २०२५-२६ मध्ये ज्या विद्यार्थ्यांनी स्वाधार योजनेचा अर्ज भरलेला आहे अशा विद्यार्थ्यांनी सन २०२६-२७ साठी स्वाधार योजनेचा नूतनीकरणाचा अर्ज सोबत दिलेल्या मा. सहायक आयुक्त, समाज कल्याण, अहिल्यानगर यांनी दिलेल्या प्रेसनोटनुसार दि. ०१/०८/२०२६ ते दि. १५/०९/२०२६ या दिलेल्या वेळापत्रकाप्रमाणे ऑनलाईन भरून मा. सहायक आयुक्त, समाज कल्याण कार्यालय, अहिल्यानगर येथे वेळेत जमा करावा.

प्राचार्य,<br>
चंद्ररूप डाकले जैन कॉलेज ऑफ कॉमर्स,<br>
श्रीरामपूर.

सोबत मा. सहायक आयुक्त, समाज कल्याण कार्यालय, अहिल्यानगर यांची प्रेसनोट

सदर सूचना महाविद्यालयाच्या वेबसाईडवरदेखील टाकण्यात आलेली आहे

**www.cdjcollege.com**

महाराष्ट्र शासन
## सहायक आयुक्त, समाज कल्याण, अहिल्यानगर,
भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन सावेडी नाका, अहिल्यानगर, पिन- ४१४००३
Email: spldswo.nagar@gmail.com
दूरध्वनी क्र.०२४१-२३२९३७८

जा.क्र.सआसकप/स्वाधार/नुतनीकरण/२०२६-२७/२६३५ दि११.०८.२०२६

प्रति,
जिल्हा माहिती अधिकारी,
अहिल्यानगर

विषय :- स्थानिक वृतमानपत्रातुन बातमीस विनामुल्य प्रसिद्धी देणे बाबत.
सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षाकरीता भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेअंतर्गत नुतनीकरण (Renew) ऑनलाईन अर्ज सादर करणेबाबत.

संदर्भ :- १. मा. आयुक्तालयाचे पत्र क्र. २७०५ दिनांक ०७.०८.२०२६.
२. मा. आयुक्तालयाचे पत्र क्र. २७०९ दिनांक ०७.०८.२०२६.

उपरोक्त विषयी विनंती करण्यात येते की, शासकीय वसतिगृहात प्रवेश घेण्यास पात्र असलेल्या परंतु शासकीय वसतिगृहात प्रवेश न मिळालेल्या/शासकीय वसतिगृहात प्रवेश न घेतलेल्या तसेच निवास, भोजन व अन्य सुविधां अभावी पुढील शिक्षण घेऊ शकत नसलेल्या अनुसूचित जाती व नवबौध्द प्रवर्गातील विद्यार्थ्यांपैकी ११ वी, १२ वी तसेच १२ वी नंतरच्या व्यावसायिक तसेच बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमांमध्ये विविध स्तरावरील महाविद्यालयात/शिक्षण संस्थांमध्ये प्रवेश मिळालेल्या विद्यार्थ्यांना शासकीय वसतिगृहातील मुलां/मुलींप्रमाणे भोजन, निवास, शैक्षणिक साहित्य व इतर आवश्यक सुविधा स्वत:उपलब्ध करुन घेण्यासाठी आवश्यक रक्कम विद्यार्थ्यांच्या आधारसंलग्न बँक खात्यामध्ये थेट जमा करण्यासाठी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेची अंमलबजावणी करण्यात येत आहे.

सन २०२५-२६ या वर्षात स्वाधार योजनेचा लाभ घेतलेल्या विद्यार्थ्यांना सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षाकरीता ऑनलाईन अर्ज नुतनीकरण (Renew) करणेकरीता दिनांक ०१ ऑगस्ट, २०२६ ते दिनांक १५ सप्टेंबर, २०२६ या कालावधीत पोर्टलवर सुविधा उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. सदर बातमीस स्थानिक वृतमानपत्रातुन व डिजिटल न्युज पोर्टल्सवर विनामुल्य प्रसिद्धी द्यावी ही विनंती.

सोबत :- प्रेसनोट

(प्रविण कोरगंटीवार)
सहायक आयुक्त,
समाज कल्याण,अहिल्यानगर

प्रत :- सर्व प्राचार्य,महाविद्यालय, अहिल्यानगर यांना कळविण्यात येते की, सोबतची प्रेसनोट कॉलेजच्या अधिकृत नोटीस बोर्डवर लावण्यात यावी.

प्रत :- माहीतीस्तव सविनय सादर
१. मा. आयुक्त, समाज कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे
२. मा. सहआयुक्त (शिक्षण), समाज कल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
३. मा. प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण विभाग नाशिक .

C. D. Jain College of Commerce, Shrirampur
Inward No. 84
Date :- 13/ 8 /2026

12-8-2026

13-08.2026

प्रेसनोट

शासकीय वसतिगृहात प्रवेश घेण्यास पात्र असलेल्या परंतु शासकीय वसतिगृहात प्रवेश न मिळालेल्या/शासकीय वसतिगृहात प्रवेश न घेतलेल्या तसेच निवास, भोजन व अन्य सुविधांअभावी पुढील शिक्षण घेऊ शकत नसलेल्या अनुसूचित जाती व नवबौध्द प्रवर्गातील विद्यार्थ्यांपैकी ११ वी, १२ वी तसेच १२ वी नंतरच्या व्यावसायिक तसेच बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमांमध्ये विविध स्तरावरील महाविद्यालयात/शिक्षण संस्थांमध्ये प्रवेश मिळालेल्या विद्यार्थ्यांना शासकीय वसतिगृहातील मुलां/मुलींप्रमाणे भोजन, निवास, शैक्षणिक साहित्य व इतर आवश्यक सुविधा स्वतः उपलब्ध करुन घेण्यासाठी आवश्यक रक्कम विद्यार्थ्यांच्या आधारसंलग्न बँक खात्यामध्ये थेट जमा करण्यासाठी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेची अंमलबजावणी करण्यात येत आहे.

सन २०२५-२६ या वर्षात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेचा लाभ घेतलेल्या विद्यार्थ्यांना सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षाकरीता ऑनलाईन अर्ज नुतनीकरण (Renew) करणेकरीता दिनांक ०१ ऑगस्ट, २०२६ ते दिनांक १५ सप्टेंबर, २०२६ या कालावधीत समाज कल्याण विभागाच्या https://hmasnew.mahait.org/ पोर्टलवर सुविधा उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. विद्यार्थ्यांनी नुतनीकरण अर्ज सादर करताना मागील वर्षाचे गुणपत्रक अपलोड करणे तसेच चालू शैक्षणिक वर्षातील अभ्यासक्रमाची माहिती अद्ययावत (Update) करणे आवश्यक आहे.

ज्या विद्यार्थ्यांनी मागील वर्षी अर्ज नुतनीकरण (Renew) केला होता व त्यांना स्वाधार योजनेचा लाभ मिळाला होता, अशा विद्यार्थ्यांना विद्यमान पोर्टलवर ऑनलाईन अर्ज सादर करता येणार आहे. तसेच ज्या विद्यार्थ्यांनी मागील वर्षात प्रथम वर्षाकरीता (New) अर्ज सादर केला होता व त्यांना स्वाधार योजनेचा लाभ मिळालेला आहे, अशा सर्व विद्यार्थ्यांनाही विहित मुदतीत नुतनीकरण अर्ज सादर करता येणार आहे.

विद्यार्थ्यांचे अर्ज विहित वेळेत व मुदतीत प्राप्त होऊन त्यांची तपासणी करुन स्वाधार योजनेचा लाभ वेळेत अदा करणे आवश्यक असल्याने, सन २०२५-२६ मध्ये स्वाधार योजनेचा लाभ घेतलेल्या सर्व विद्यार्थ्यांनी दिनांक १५ सप्टेंबर, २०२६ पर्यंतच्या मुदतीत आपला नुतनीकरण अर्ज ऑनलाईन पद्धतीने सादर करावा. विहित मुदतीत अर्ज सादर न केल्यास संबंधित विद्यार्थी स्वाधार योजनेच्या लाभापासून वंचित राहण्याची शक्यता आहे, याची सर्व विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.

तरी पात्र सर्व विद्यार्थ्यांनी विहित वेळेत आपले नुतनीकरण अर्ज ऑनलाईन पद्धतीने सादर करावेत, असे आवाहन प्रविण कोरगंटीवार, सहायक आयुक्त, समाज कल्याण अहिल्यानगर यांनी केले आहे.

सहायक आयुक्त,
समाज कल्याण,अहिल्यानगर